# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक: 02.06.2024** **वार: रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या काल संपलेल्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद.**
2. **खाजगी दूरचित्र-वृत्तवाहिन्या आणि अन्य प्रतिनिधी संस्थांनी प्रसिद्ध केलेल्या एक्झिटपोल नुसार भाजप प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर येण्याची शक्यता.**
3. **ईशान्य, मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेची लाट येत्या दोन दिवसांत हळूहळू कमी होणार, तर दिल्ली, पंजाब, राजस्थानमध्ये आज उष्णतेची लाट कायम राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज.**
4. **वस्तू आणि सेवा कराचं म्हणजे जीएसटीचं संकलन मे महिन्यात एक लाख ७३ हजार कोटी रुपयांवर.**

**आणि**

5. **आसाममधली पूरस्थितीमुळे ६ लाखांहून अधिक लोकांना फटका. मृतांची एकंदर संख्या 11 वर.**

**सातवा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या सातवा आणि शेवटचा टप्पा काल संपला. या टप्प्यात आत्तापर्यंत ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली आहे. सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील ५७ मतदारसंघामध्ये हे मतदान झालं. बिहारमध्ये ५१ पूर्णांक ९२ शतांश टक्के, हिमाचल प्रदेशमध्ये ७० पूर्णांक पाच, झारखंडमध्ये ७० पूर्णांक ६६, पंजाबमध्ये ६१ पूर्णांक ३२, उत्तर प्रदेशात ५५ पूर्णांक ५९, पश्चिम बंगालमध्ये ७३ पूर्णांक ७९, ओडिशात ७० पूर्णांक ६८, तर चंडीगडमध्ये ६७ पूर्णांक ९० शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. हा टप्पा संपल्यामुळे १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या जगातल्या सर्वांत मोठ्या मतदान प्रक्रियेची सांगता झाली आहे. या सातही टप्प्यांमध्ये मतदान शांततेत आणि सुरळीतपणे पार पडल्याचं निवडणूक आयोगानं एका निवेदनात म्हटलं आहे.

**एक्झिट पोल**

मंगळवारी ४ जून रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या आधी, खाजगी दूरचित्र-वृत्तवाहिन्या आणि अन्य प्रतिनिधी संस्थांनी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल चाचणीचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी NDA, लोकसभा निवडणुकीत सत्ता टिकवून ठेवणार असल्याचं, बहुतांश अंदाजांमध्ये दिसून येत आहे. 272 जागांचा बहुमताचा टप्पा सहजी ओलांडत राष्ट्रीय लोकशाही आघाडी 543 सदस्यांच्या लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत मिळवू शकेल असा अंदाज अनेक संस्थांनी वर्तवला आहे. नरेंद्र मोदींच्या

नेतृत्वाखालील NDA सरकार 350 हून अधिक जागा जिंकून पुन्हा सत्तेत येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या इंडि आघाडीला 125 ते 150 जागा मिळतील. 2024 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील NDA आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडि आघाडी यांच्यात थेट लढत झाली आहे. सत्ताधारी भाजपला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळण्याची आशा आहे.

**उष्णता-लाट**

ईशान्य, मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेची लाट येत्या दोन दिवसांत हळूहळू कमी होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मात्र, हरियाना, दिल्ली, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, ओडिशा, बिहार आणि झारखंडमध्ये आज उष्णतेची लाट मध्यम ते तीव्र स्वरूपात कायम राहील, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड आणि आंध्र प्रदेशातही ही स्थिती कायम राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे. ईशान्य आणि मध्य भारतात पुढच्या दोन दिवसांमध्ये कमाल तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसनं, तर पूर्व भारतात तीन ते चार अंश सेल्सिअसनं कमी होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**राष्ट्रपती**

उष्णतेच्या लाटेमुळे झालेल्या मृत्यूंबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अनेक ठिकाणी प्रशासनानं योग्य पाऊलं उचलून उष्णतेचा लाटेचा सामना कराव्या लागणाऱ्यांना मदत केल्याचं आणि इतरही नागरिक मदतीसाठी पुढं आल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. कामगार, शेतकरी, सरकारी कामांमध्ये व्यग्र कर्मचारी, तसंच इतर नागरिकांना उष्णतेपासून वाचण्यासाठी योग्य निवारा मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे. तापमानविषयक समस्यांबाबतच्या कारणांचं निराकरण करणं आणि आवश्यक काळजी घेण्याबाबत जनजागृती निर्माण करण्याची गरज असल्याचंही मत त्यांनी व्यक्त केलं आहे.

**शोक-रेमल**

तेलंगण आणि पश्चिम बंगालसह देशाच्या ईशान्य भागात रेमल चक्रीवादळामुळे झालेल्या जीवित आणि मालमत्तेच्या हानीबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भरतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**जीएसटी संकलन**

वस्तू आणि सेवा कराचं म्हणजे जीएसटीचं संकलन मे महिन्यात एक लाख ७३ हजार कोटी रुपये इतकं झालं आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत जीएसटीमध्ये दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचं त्यात नमूद करण्यात आलं आहे.

**मुंबई सीमा शुल्क**

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या महिन्यात चार दिवसांच्या छापासत्रात सीमाशुल्क विभागानं सुमारे ६ कोटी ७५ लाख रुपये किमतीचं पावणेदहा किलो किंमतीचं

सोनं आणि इलेक्ट्रनिक्स वस्तू जप्त केल्या आहेत. या छाप्यांमध्ये ८८ लाख रुपयाचं परकीय चलनही जप्त करण्यात आलं आहे, असं काल अधिकृत निवेदनात नमूद करण्यात आलं आहे. या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

**पंढरपूर- दर्शन**

पंढरपूर इथल्या विठ्ठल रूक्मिणी मंदिरात जतन आणि संवर्धन कामासाठी बंद केलेलं विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन आजपासून पुन्हा सुरू करण्यात आलं आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत विठ्ठल रूक्मिणीची नित्य पूजा झाली, त्यानंतर भाविकांसाठी पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात आलं. मंदिराला सातशे वर्षांपूर्वीचं रूप देण्यात आलं आहे. मंदिर समितीच्या वतीने विठ्ठल मंदिरात फुलांची आकर्षक सजावट देखील करण्यात आली आहे. विठुरायाचं सावळं रूप पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली आहे.

**चित्रपट महोत्सव**

अर्जेंटिना आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ म्हणजे एनएफडीसी चित्रपट महोत्सवाची मुंबईत काल सांगता झाली. या सहा दिवसांच्या चित्रपट महोत्सवात अर्जेंटिनातील तीन आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे तीन चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. त्यांना चित्रपटप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

**गाझा**

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी सुचवल्यानुसार इस्रायल आणि हमास यांनी युद्धविराम कराराला मूर्त रूप द्यावं असं आवाहन - कतार, इजिप्त आणि अमेरिकेच्या मध्यस्थांनी काल संयुक्तपणे जारी केलेल्या एका निवेदनातून केलं आहे. गाझा-संघर्ष संपुष्टात येईल आणि सर्व ओलीसांची सुटका होईल अशा तीन-टप्प्यांच्या इस्रायली प्रस्तावाचा अध्यक्ष बायडेन यांनी शुक्रवारी आपल्या भाषणात उल्लेख केला होता. मात्र “जोपर्यंत हमासची लष्करी आणि प्रशासकीय क्षमता नष्ट होत नाही आणि सर्व ओलीस मुक्त केले जात नाहीत तोपर्यंत गाझामध्ये कायमस्वरूपी युद्धविराम होणार नाही” अशी आग्रही भूमिका इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी घेतली आहे. “युद्ध संपवण्यासाठी इस्रायलच्या अटी बदललेल्या नाहीत” असं नेतन्याहू यांच्या कार्यालयानं काल जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**मणिपूर-पूर**

मणिपूरमध्ये पूर आलेल्या सखल भागातली बहुतांश ठिकाणची पाण्याची पातळी कमी होऊ लागल्यामुळे तिथली पूरस्थिती सुधारली आहे. मात्र, ख्वईरामबंद इम्फाळ मार्केट परिसराच्या भागात पुराचा फटका बसलेल्या परिसरातील सर्व दुकानं आणि कार्यालयं तीन दिवसांपासून बंदच आहेत.

**आसाम-पूर**

दरम्यान, आसाममधली पूरस्थिती आणखी बिघडली आहे. पुरामुळे १० जिल्ह्यांतील ६ लाखांहून अधिक लोकांना फटका बसला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला असून, या पुरामुळे मृतांची एकंदर संख्या 11 वर पोहोचली आहे.

25 महसूल मंडळातील एकूण 597 गावं बाधित झाली असून राज्यभरातील 4 हजार 800 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. राज्य सरकारनं पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये 187 मदत शिबिरं आणि 96 मदत साहित्य वितरण केंद्रं उघडली आहेत.

बचाव आणि मदत कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दल आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तुकड्याही तैनात करण्यात आल्या आहेत. हैलाकंदी, कचार आणि करीमगंज या सर्वाधिक प्रभावित जिल्ह्यांमध्ये ३ जणांचा मृत्यू झाला असून एनडीआरएफचं अतिरिक्त पथक गुवाहाटीहून या जिल्ह्यांमध्ये विमानाद्वारे तैनात करण्यात आलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**